CMYK

बीड । मंगळवार

२५.०३.२०२५

वर्षे : ४ अंक : ३४६

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com


# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# बीड जिल्हा परिषदेचा १५ कोटी २१ लाखाचा शिलकीचा अर्थसंकल्प




## सीईओ आदित्य जीवने यांनी केला अर्थसंकल्प जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या २०२५-२६ या वर्षातील आरंभीची असेल ते सह एकूण महसुली जमा रुपये १६, १३,३१, १०२ इतकी असून प्रस्तावित खर्च १५ कोटी २१ लक्ष असून ९१ लक्ष ४३ हजार १०२ इतका महसुली समितीच्या अर्थसंकल्पास आदित्य जीवने बीड जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोमवारी सदर माहिती सभागृहात दिली. यावेळी प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह विभागप्रमुख



उपस्थित होते. प्रारंभी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी जिल्हा परिषदेच्या विभागनिहाय खर्चाच्या यावेळी बाबनिहाय तरतुद सादर केली. बांधकाम विभाग दोन कोटी ४४ लक्ष १४ हजार, शिक्षण विभाग १ कोटी ७४ लक्ष ४५०००, आरोग्य विभाग १९ लक्ष २०००, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ०१ कोटी, समाज कल्याण विभाग ०३ कोटी ५१ लक्ष १००००, महिला व बालकल्याण विभाग ७४ लक्ष ४०००, कृषी विभाग ३० लक्ष ४० हजार, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग ७४ लक्ष ३०००, वनीकरण विभाग व व्याज १०,०००, पंचायत राज कार्यक्रम विभाग ०३ कोटी ९३ लक्ष ५६ हजार, लघु पाटबंधारे विभाग १०, ४००, एकूण १५ कोटी २१ लक्ष ८८,००० रुपयाच्या प्रस्ताविक खर्चास मान्यता देण्यात आली आहे. यावेळी अर्थसंकल्प मांडताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी, ग्रामविकासासाठी बीड जिल्हा परिषद कटिबद्ध असून विविध म हत्वकांक्षी निर्णय घेण्यात आले आहेत ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण महिलांचे सबलीकरण, शिक्षण आणि आरोग्य विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तरतुदीसह माहिती तसादर केली. जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागाच्या उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण विकासाच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठीच्या योजना राबविण्याचा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी महसुली जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे सविस्तर वाचन करून उपस्थित विभाग प्रमुख आणि पत्रकारांना सविस्तर माहिती दिली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा म ोकाटे, प्रकल्प संचालक राजेश मोराळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम (१), पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख, आदीसह विभाग प्रमुख उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली बोराडे कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.

प्राचार्य बोराडे यांच्या निधनानंतर सहवेदना व्यक्त करण्यासाठी उपमुख्यमंत्री श्री. पवार आज छत्रपती संभाजीनगर येथे आले होते. प्राचार्य बोराडे यांच्या विद्यानिकेतन कॉलनी येथील 'शिवार' या निवासस्थानी त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली व विचारपूस केली.



प्राचार्य बोराडे यांच्या पत्नी सुलभा बोराडे, कन्या प्रेरणा दळवी, तृप्ती इंगळे, हर्षवर्धन दळवी, पृथ्वी इंगळे, आदित्य जगताप, पुतणे संजय बोराडे, अनिरुद्ध पाटील हे बोराडे यांचे कुटुंबीय तसेच आ. सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे यावेळी उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यातील दोन्ही घटनातील पिडितांना लवकर न्याय मिळवून देणार

### राज्य अनुसूचित जाती व जमाती समिती उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा बीड दौरा

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार येथील पारधी समाजाच्या झोपडी हटवण्याबाबत वन विभागाने केलेली कार्यवाही अक्षेपार्ह आहे आणि याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश मी दिले आहेत अशी माहिती राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड धर्मपाल मेश्राम यांनी पत्रकारांशी



संवाद साधताना दिली.

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार आणि जामगाव भेटीत त्यांनी आज या घटनांमध्ये पिडित कुटुंबीयांशी संवाद साधला आणि त्यानंतर आष्टी विश्रामगृह येथे संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली त्यानंतर आष्टी विश्रामगृहात ते पत्रकारांशी बोलत होते. शिरूर कासार येथे पारधी वस्तीवर जाळपोळ झाल्याची तक्रार प्राप्त होती तथापि यातील व्यक्तींना नजीकच असलेल्या राक्षसभूवन येथे १९६४ साली जमीन दिली असे महसूल विभागातर्फे यावेळी सांगण्यात आले. वन विभागाने केलेल्या कारवाईत कोणत्याही प्रकारे इजा झालेली नाही तेथील पारधी कुटुंबीयांना कारवाई

▶▶ उर्वरित पान २ वर

## साकोली मतदार संघातील पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करावी - मंत्री पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील साकोली मतदारसंघातील ७५ ते ९९ टके प्रगती पथावरील पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करून कार्यान्वित कराव्या,तसेच या क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना पूर्ण न होण्यास जबाबदार असणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक करावी कारवाई करावी, असे निर्देश

▶▶ उर्वरित पान २ वर

## मस्साजोग येथील नदी खोलीकरणाच्या कामाने घेतला वेग : ॲड. अजित देशमुख यांनी केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग तालुका केज येथील नदी खोलीकरणाच्या काम ाने वेग घेतला आहे. नाम फाउंडेशन मार्फत हे काम चालू आहे. गेल्या काही दिवसात चांगल्या पद्धतीने काम होत आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख आणि नामचे समन्वयक राजाभाऊ शेळके यांनी



केली. नदी खोलीकरणाचा हा प्रकल्प योग्य वेळेत सुरू झाल्याम ुळे पावसाळ्यापूर्वी खूप मोठे काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांनी देखील या काम ाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे कामाने चांगली गती घेतली असून कामाकडे लक्ष देण्यासाठी सक्षम कार्यकर्त्याची नियुक्ती देखील करण्यात आली आहे.रविवारी या कामाची पाहणी करण्यासाठी ॲड. अजित देशमुख यांच्यासह राजाभाऊ शेळके, भागवत कदम,

▶▶ उर्वरित पान २ वर




## आमदार सुरेश आण्णा धस यांच्या आमसभेत पाटोदा तहसीलला आदेश देऊन ही संजय निराधार विभाग जागेवरच?

### निराधार विभाग तहसीलच्या तळमजल्यावर कधी येणार ? पाटोद्यातील दिव्यांगाचा आमदार महोदयांना प्रश्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

संजय गांधी निराधार योजनेचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे असा आहे, अशा घटकांनी सम ाजातील इतर घटकांवर अवलंबून न राहता स्वत:ला आत्मविश्वासाने जगता यावे म्हणून ही योजना महाराष्ट्र सरकार सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सुरू केलेली आहे, या योजनेअंतर्गत, निराधार व्यक्तींना आर्थिक सहाय्य म्हणून



सध्या दरमहा पंधराशे रुपये मानधन दिले जाते परंतु सप्टेंबर - आक्टोंबर २०२४ पासून ते आतापर्यंत पाटोदा तालुका व जिल्ह्यातील काही

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# सलोख्याचा वाहक, मैत्रीचा नायक, लोकपत्रकार एक लोकआवाज



माझं गाव तलवाडा त्यांचं अन माझ्या गावच एक नातं आहे ह टिपू सुलतान जयंती म्हणजे तावरे साहेबांचं भाषण माझ्या गावच आंदोलन असलं कि त्यांचा सहभाग आलाच . बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र नाळवडी येथील रहिवासी असलेल्या लोक पत्रकार भागवत तावरे यांनी आपल्या लिखाणातून आपली स्वतः ची ओळख निर्माण करून घेतली गरीब कुटुंबातील जन्म घेतलेल्या लोक पत्रकार यांनी लहान पनांपासून स्व धर्म सहभाव घेतलेला वसा पुढे चालवत आहेत प्रत्येक समाजात वावरताना कोणत्याही समाजात तेढ निर्माण होईल कधीच चुकीचे वागत नाही प्रत्येक समाजातील माणसासोबत आपल्या लहान भावा सारखे व मोठे भावासारखे वागणारे व मनमिळाऊ व्यक्तिमत्व अनेकांचे गोरगरिबांच्या सुखदु:खात एक कॉलवर धाऊन येणारे कोणत्याही समाजाचा विषय असो त्यांना कॉल केल्यावर प्रश्न सॉल केल्याशिवाय मागे माघार नाही घेणारे हे प्रश्न कोणताही कठीण असले तरी शेवटपर्यंत सत्याची बाजू म्हणून ते पुढाऱ्यांच्या कसला विषय असो किंवा प्रशासनाचा विषय असो त्यांना न्याय मिळवून देणारे कोणत्याही परिस्थितीत माघार नाही येणारे भागवत तावरे सर म्हणजे एक आणि अडचणी एक कॉलवर धावून येऊन आपले प्रश्न सोडून देणारे व्यक्तिमत्व आहे मी आज भागवत तावरे सर सोबत अनेक वर्षापासून सहवास केला आहे त्यांना मी जवळून पाहिले आहे तावरे सरांना कोणत्याही प्रश्नावर काही आपलं काम पडले तर त्यांना आपण फोन केला तर बोला आलताफ भाई काय अडचण आहे. समाजात किंवा जीवनातील प्रवासात अनेक लोक पाहिले आहेत की गरीबाला कधी गरज पडली तर कोणी समोर येत नाही परंतु लोकपत्रकार भागवत तावरे यांना मी कोरानाच्या काळात सुद्धा रात्रीचे तीन वाजता दोन वाजता फोन केले तर त्यांनी अनेक गोरगरिबांना मदत केलेली प्रत्यक्ष मी अनुभवले आहे. आजही भागवत तावरे म्हणजे एक उगवता तारा आहे सत्य काम करत असताना अनेक अडीअडचणी ला तावरे सरांना समोर जावे लागले आहे. आज एक छोटे खेडेगावातून नाळवंडी यासारख्या गावातून येऊन बीड जिल्ह्यात त्यांनी प्रत्येक समाजातील युवकांच्या मनावर आपली प्रेमाची थाप पसरलेली चित्र पहावयास मिळत आहे भागवत तावरे म्हणजे एक मित्र नाही तर भावा समान सर्व समाजात वागणारा एक मोठा भाऊ मानला जात आहे. शेतकरी कुटुंबात जन्म झालेले तावरे नेहमी शेतकऱ्यांची बाजू मांडतात सत्तेशी भांडतात . मुस्लिम भावना जपताना त्यांना कितीतरी त्रास झाला. गोरगरिबांच्या मदतीला सदैव धावून येणारे आपल्या लिखाणातून न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर असणारे ज्ञानाच्या माध्यमातून विचाराची ज्योत पेटवणारे

जो झुकला ना कधी, थकला ना कधी, ना मानली कधी कुणासमोर हार. लेखणीतून त्याने दिले उत्तर सर्वांना शस्त्राची याच आपल्या वाढवून धार जपली ज्याने अखंड माणूसकी अन् माणसांमधील प्रत्येक अवतार.. समाजसेवेचा घेतलेला वसा जपताना ना घेतली कधी या पठ्ठ्याने माघार. माणसामधील माणूस जपताना ना पाहीला कधी ज्याने जात-धर्म, ना बघितले इनासानियत ज्याच्या नजरेत आहे.सदा-सर्वदा श्रेष्ठ फक्त आणि फक्त माणसाचे कर्म आहे. लोकपत्रकार भागवत तावरे सर आपणास वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा...

– पत्रकार आल्ताफ कुरेशी,
तलवाडा

## पिचलेला माणूस

*थोर संत आणि ज्ञानी लोक सांगून गेले. शरीर नश्वर आहे आणि आत्मा अमर आहे. त्यात गैर असं काहीच नाही. पण, मी देवभोळा नसल्यामुळे एका अतिशय सामान्य माणसाच्याच बाजूने विचार करेल. कौटुंबिक, सामाजिक, आणि वैयक्तिक अपेक्षांचे डोंगर छातीवर घेऊन जाणाऱ्या माणसाला जेव्हा ठेच लागते तेव्हा जी कळ येते ती ह्या देशातूनच निघते.*

*भर उन्हात सिग्नल वर उभ्या असलेल्या माणसाला संध्याकाळच्या जेवणाची आणि पुढील महिन्यात औषधाच्या खर्चाची आठवण पहिले येते. तुकाराम ांच्या अभंगाने मनाला उभारी येत असेल ही. किंबहुना येतेच. पण, पगार अकाऊंट ला जमा झाल्यावर होणार आनंद त्याहून कदाचित जास्त असेल.*

*इमाने इतबाने कर भरणा-या व्यक्तीला जेव्हा खराब रस्ते, अपुरी बीज निकृष्ठ दर्जाचं शिक्षण दिल जात तेव्हा जो आक्रोश होतो तो जगातला कोणताही अभंग शांत करू शकत नाही. तिथे हा देहच वेदना सहन करतो. प्रश्न दैववादी असण्याचा नाहीचे!*

*व्यवस्थेचं अपयश लपवण्याकरता जेंव्हा देवाचं भांडवल केलं जात, तेव्हा खऱ्या अर्थाने माणसातल्या दैवाची हत्या होते. भारतात ला माणूस हा दैवाच्या भक्तीत नाही तर अपयशी व्यवस्थेच्या विजत राहाणाऱ्या वडग्यात भिजतो.*

*व्यवस्थेकडून पूर्ण न झालेल्या प्राथमिक गरजा तो देवाच्या दारावर शोधतो. परंतु व्यवस्थेच्या ठेकेदारांनी तिथेही दानपेट्या आणि धर्मांध लोकांनी नवस मांडून ठेवले आहेत.*

*पैगंबराची चादर असो, नैवेद्याचा पेढा असो की येशू ची मेणबत्ती असो. माणूस हा प्राणी सगळीकडे पिंचलाच जातो. सहज हातात लागणार व्यवस्थेचं सावज आहे तो.*

पान ४ वरून पुढे...

### 'चाळणी झालेल्या...

नगरविकास विभागाकडे पाठवलेला प्रस्ताव लालफीतीत अडकला आहे. शहरातील नगर रोड ते पालवण चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संतोषीमाता मंदिर, राजुरी वेस -बलभीम चौक -माळीवेस , बलभीम चौक ते दगडी पुल,थिगळे कॉम्प्लेक्स ते जालना रोड, जिजामाता चौक ते मसरतनगर अशा एकुण शहरातील १७ अत्यंत महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांचा प्रस्ताव वर्षभरापूर्वी बीड नगरपालिकेने नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.१७ रस्ते ४० फुट रूंदीचे होणार असुन त्यासाठी ११० कोटी रुपये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत होणार आहेत. बीड शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे.शहरात वर्दळीचा असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज ते कारंजा टावर या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असुन वाळु मिश्रित खडीचा धुरळा उडत आहे. वाहनांचे अपघात होत आहेत. त्यामुळे तातडीने प्रस्ताव मंजूर करून रस्त्यांसाठी निधी देण्यात यावा.

धुळे ते सोलापूर शहरांतर्गत रस्त्यांवरील खड्डे बुजवून दुभाजकांचे अर्धवट काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत

शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बार्शी नाका ते राष्ट्रवादी भवन पर्यंत मागील अनेक वर्षांपासून मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले असुन या खड्ड्यात वाहने आदळुन अपघातात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर या मार्गावरील जालना रोड वरील दुभाजकांचे काम अर्धवट असुन दुभाजकांसाठी जागा सोडण्यात आली असुन त्याठिकाणी माती टाकण्यात आली आहे. त्यामुळे रस्ता ओलांडताना वाहनांची चाके फसुन अपघाताच्या घटना घडत आहेत.तर दुसरीकडे महामार्गावरील मुख्य सिमेंट रस्त्याच्या बाजुचे साईडपंखे भरण्यात आले नसुन दुचाकी वाहनचालकांचे घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

बीड ते अहिल्यानगर महामार्गाचे बीड शहरातील काम संथगतीने असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे

बीड शहरातील मुख्य रस्ता असलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याची दुरावस्था झाली आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केल्यानंतर या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र काम करणाऱ्या ठेकेदार यंत्रणेने नियोजन शून्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. बालेपीर पासून छत्रपती शिवाजी महाराज

पान ४ वरून पुढे...

पुतळ्यापर्यंत रस्ता पूर्ण झाला असला तरी काही भागातील खड्डे ,रस्त्यांचे जोड कायमच आहेत. या ठिकाणी खडी, धुराळा उडून वाहन चालकांना त्रास होतो. या रस्त्यावर जिल्हा न्यायालय, समाज कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम विभागाचे कार्यालय ,मुख्य प्रशासकीय इमारत अशी ६६ शासकीय कार्यालय असल्याने दुचाकीची वाहतूक मोठी आहे. त्यामुळे कायम गर्दी असते त्यामुळे संथगतीने चालणारे रसत्याचे काम जलदगतीने पुर्ण करण्यात यावे.

### लोकाशा महोत्सवासाठी...

प्रांगणात दिमाखदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती संपादक विजयराज बंब यांनी दिली .

लोकाशा महोत्सवा संदर्भात माहिती देताना, संपादक विजयराज बंब यांनी सांगितले की, लोकाशा महोत्सवाची सुरुवात २०१० साली करण्यात आली होती. यावर्षी लोकाशाच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान राज्यस्तरीय लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.३१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा क्रांतीनाना मळेगावकर यांचा कार्यक्रम होणार आहे . यामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व महिलांना भेटवस्तू देण्यात येणार आहे. होम मिनीस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमातील विजेत्या महिलांना प्रथम बक्षीस कुलर, द्वितीय बक्षीस सोन्याची नथ तर तृतीय बक्षीस आकर्षक पैठणी मिळणार आहे . दि.१ एप्रिल रोजी सायं.५ वाजता खुल्या व सोलो डान्स स्पर्धा होणा आहेत. खुल्या डान्स स्पर्धेतील स्पर्धकांना प्रथम बक्षीस ११००० रूपये, दितीय बक्षीस ५००० रूपये, तर तृतीय बक्षीस ३००० रूपये. मिळणार आहे. सोलो डान्स स्पर्धा दोन गटात होणार असून, दोन्ही गटाना प्रत्येकी प्रथम बक्षीस ५००० रूपये, द्वितीय बक्षीस ३००० रूपये, तर तृतीय बक्षीस २००० रूपये, देण्यात येणार आहे .

अमृतमहोत्सवी सत्कार

लोकाशा महोत्सवात ज्या दांम्पत्यांचे वय ७५ वर्षापेक्षा अधिक आहे अशा ७५ दांम्पत्यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात येणार आहे, यशिवाय जे कुटुंब एकत्र राहते अशा २५ आदर्श कुटुंबाचा सत्कार करण्यात येणार आहे .

लोकाशा महोत्सवातील सर्व कार्यक्रमास बीड शहर व जिल्ह्यातील जनतेने मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संपादक विजयराज बंब व लोकाशा महोत्सव समितीने केले आहे .

पान ४ वरून पुढे...

### मालकाचे पैसे...

फुलेनगर माजलगाव याने केला आहे. त्यावरुन त्यास माजलगाव येथुन ताब्यात घेवुन गुन्हा अनुषंगाने बारकाईने विचारपुस केली असता त्याचे सांगितले की, सदर गुन्हयातील फिर्यादी सहमद्दीन फहमुद्दीन शेख रा. फुलेनगर याने त्यास इंस्टाग्राम वरुन कॉल करुन त्याच्या मुलीची तब्यीयत खराब आहे तिच्या उपचारासाठी पैशाची गरज आहे तो मालकाचे कुलरची डिलीव्हरी देवुन कुलरचे पैसे घेवुन येणार आहे तु कारी फाटयाजवळ पाच ते सहा वाजता थांब आणी कांही इसम मला मारहाण करुन माझे डोळयात मिर्ची पावडर टाकुन माझे कडील पैसे घेवुन गेले असे त्याचे मालकाला सांगतो. असा प्लान करुन कारी फाटयाजवळ दोघांनी येवुन सहमुद्दीने शेख याने त्याचे जवळील नगदी १,३५,८००/- रु रहिम चाँद शेख यास दिले आहे. त्यानंतर पो.स्टे.दिंद्रुड येथे गुन्हा नोंद केला आहे.

सदरचा गुन्हा फिर्यादीनेच त्याचे मालकाचे कुलरचे विक्रीचे पैसे स्व:चे फायद्यासाठी चोरण्याचा बनाव करुन आरोपी रहिम चाँद शेख वय २६ वर्षे रा.फुलेनगर माजलगाव यांचे मतदीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले झालेने आरोपी रहिम शेख यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन १,३५,८००/- रु नगदी जप्त करुन पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे.दिंद्रुड यांचे ताब्यात देण्यात आले आले असुन पुढील तपास पो.स्टे.दिंद्रुड हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. नवनीत काँवत अपोलीस धीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक, बीड व पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयसिंग जोनवाल, पोउपनि महेश विघ्ने, ग्रेपोउपनि हनुमान खेडकर, पोह/महेश जोगदंड, तुषार गायकवाड, जफर पठाण, पोअं/बप्पासाहेब घोडके, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/ गणेश मराडे यांनी मिळुन केली आहे.

### चिंतेश्वराच्या कृपेने...

आषाढी एकादशीला महिला मंडळाकडून प्रसादाचे आयोजन करण्यात येत असतें तसेच महाशिवरात्री निमित्त भजनांचा कार्यक्रम होत असतो त्याच बरोबर महाशिवरात्री उपवास प्रसाद तसेच महाप्रसाद सुध्दा असयचा आणि भक्तगण मोठ्या मनोभावे इथे हजेरी लावतात. दररोज सायंकाळी हरिपाठ दर सोमवारी महाआरती करण्यात येते. यंदा तेरावे वर्ष असून श्री.सिध्देश्वर सेवा समितीच्या माध्यमातून श्रीहरी रसाळ महाराज यांच्या मधुर वाणीतून श्री शिवमहापुराण कथेला प्रारंभ झाला. असल्याने परिसरात भक्तमय वातावरण निर्माण झाले.

पान १ वरून पुढे...

### बीड जिल्ह्यातील...

झाल्यानंतर २ तासांनी अज्ञात समाजकंटकाने त्रास दिला असे वनविभागातर्फे सांगण्यात आले. याबाबत कायदेशीर कारवाई करताना सर्व कारवाई तोंडी सूचना द्वारे देण्यात आल्याचे उघडकीस आले असून यात वनविभागाने कायद्याने ठरवून दिलेल्या नियमानुसार कारवाई करायला हवी होती असे ॲड मेश्राम म्हणाले.

ॲड मेश्राम यांनी आष्टी नजिक असलेल्या जामगाव येथील पिडित कुटुंबीयांचीही भेट घेतली. यात एका मातंग समाजातील व्यक्तींची हत्या दोन जणांनी केली असून त्यातील एक अल्पवयीन आहे. यात सदर इसमाची हत्या पैसे हडपण्यासाठी झाल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होत आहे त्यामुळे सामाजिक न्याय विभागाने १५दिवसाच्या आत पंचनामा व इतर कार्यवाही पूर्ण करावी व पीडित कुटुंबाला देय आर्थिक मदत प्रदान करावी असेही निर्देश या भेटीत दिले. सदर व्यक्तीचा मुलगा हा पोलीस भरतीची तयारी करीत आहे घरातील कर्त्या व्यक्तीची हत्या झाल्याने या मुलास शासकीय नोकरी देण्यात यावी असे आयोग प्रस्तावित करणार आहे असे ॲड मेश्राम यांनी सांगितले. या स्वरूपाचे निर्देश त्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

आष्टी विश्रामगृहावर झालेल्या बैठकीस विभागीय अधिकारी वसिम शेख, वनसंरक्षक ए. बी. गर्कल, सहाय्यक आयुक्त समाज कल्याणचे प्रदीप भोगले, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण

पान १ वरून पुढे...

हनपुडे पाटील, तहसीलदार सुरेश घोळवे आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिरूर कासार तसेच जामगाव प्रकरणी सर्व संबंधित विभागांनी आपले म्हणणे व अहवाल सादर करावेत असे निर्देश ॲड मेश्राम यांनी अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत दिले. यानंतर झालेल्या पत्रकार संवादात त्यांच्यासोबत भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे उपाध्यक्ष ॲड वाल्मिक निकाळजे यांचीही उपस्थिती होती.

### साकोली मतदार...

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. साकोली विधानसभा मतदार संघातील पाणी पुरवठा योजनांची आढावा बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होते यावेळी आमदार नाना पटोले, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, जल जीवन मिशनचे संचालक ई.रवींद्रन, सहसचिव बी जी पवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे मुख्य अभियंता सुभाष भुजबळ, भंडारा जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता विजय देशमुख व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री.पाटील म्हणाले की, भंडारा जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत चालू असणाऱ्या पाणीपुरवठा योजना सद्यस्थिती आणि प्रगती पथावरील योजनांची भौतिक प्रगती पाहता या योजना तातडीने पूर्ण करून कार्यान्वित करावी असे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.तसेच जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेतील योजनांची

पान १ वरून पुढे...

स्थिती ,जिल्हा परिषदेच्या मंजूर पाणीपुरवठा योजनेची स्थिती, शंभर टक्के कार्यवाहीत घरगुती नळ जोडणी, जिल्हा निहाय हर घर जल सद्यस्थिती, जलजीवन मिशन सुधारित योजना, खर्चाची सद्यस्थितीचा आढावा मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी घेतला.

### मस्साजोग येथील...

तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मनोज देशमुख, बाळासाहेब देशमुख यांच्यासह अन्य शेतकऱ्यांनी भाग घेतला. चांगल्या पद्धतीने काम होत असल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले. या नदीतील गाळ निघतो तेवढा काढल्यानंतर मोठे खड्डे होतील आणि त्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होईल. त्यातून गाव विकासाला चालना मिळेल त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्व गावकऱ्यांनी या कामाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन देखील शेळके आणि ड. देशमुख यांनी केले आहे.

### आमदार सुरेश...

तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना अद्याप मानधन मिळाले नसल्यामुळे अंध-दिव्यांग, अनाथ मुले, मोठ्या आजाराने ग्रस्त व्यक्ती, वयोवृद्ध, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्ता महिला, अत्याचारी महिला या सर्व लाभार्थ्यांवर सध्या वाढत्या महागाईमुळे उपासमारीची वेळ येवून ठेपली आहे. शासन स्तरावरून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण

पान १ वरून पुढे...

योजनेच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना दरमहा मानधन दिले जाते परंतु संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना गत चार - चार महिन्यांपासून मानधन दिले जात नाही, वर्षभरात बारा महिनेही लाभार्थ्यांकडून दरमहा डिबीटीच्या नावाने कागदपत्रे गोळा करून काहिना काही तांत्रिक अडचणी पुढे करून त्यांची अवहेलना केली जात आहे हि राज्यासह देशाची फार मोठी शोकांतिका असल्याचे म्हणत दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्रचे संस्थापक जीलानी शेख यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्यात यावे तसेच संजय गांधी विभाग तिसऱ्या मजल्यावर असल्यामुळे वयोवृद्ध दिव्यांग यांचे चढण्या उतरण्यासाठी हाल होत आहेत सबंध संजय गांधी कार्यालय तळमजल्यावर घेण्यात यावी अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे तसेच मानधन जमा न झाल्यास पुढील आठवड्यात कुठलीच पुर्वसुचना न देता जिल्हाधिकारी कार्यालय येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना कार्यालयात शेकडो लाभार्थ्यांसह तहसीलदार यांना व संबंधित बीड जिल्हायातील सर्वच तालुक्यातील तहसीलदारांना घेराव घालण्यात येणार असल्याचे ही वारंवार सांगूनही पाटोदा तहसील प्रशासनाला जाग येईना यामुळे तात्काळ निराधार संजय गांधी श्रावण बाळ विभाग तात्काळ पाटोदा तहसील इमारतीच्या तळमजल्यावर घ्यावा नसता लोकशाही पद्धतीने आंदोलन करू असा इशारा दिव्यांगाचे नेते जिलानी सय्यद यांनी दिली आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिवछत्र परिवाराच्या रोजा इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

**गेवराई । प्रतिनिधी**

२२ (प्रतिनिधी) मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराच्या वतीने गेवराई येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला हिंदू अणि मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, जयसिंग पंडित युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. आजच्या या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदु बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्यामुळे शिवछत्र परिवाराच्या या इफ्तार पार्टीत हिंदू मुस्लिम समाजातील ऐक्य पुन्हा एकदा दिसुन आले.

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबीय व शिवछत्र परिवाराच्या वतीने सालाबादाप्रमाणे मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे भव्य आयोजन केले होते. रमजान महिण्याच्या निमित्ताने शनिवार दि. २२ मार्च रोजी सायं. ६ : ४२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, नगर परिषद कॉम्लेक्स, गेवराई येथे भव्य इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोजा ईफ्तार पार्टिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित जयभवानी व जगदंबा



शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मुहम्मद अब्दुल हन्नान, मुहम्मद गौस, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, मनोज हजारे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगरसेवक राधेश्याम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक तात्या आतकरे, तालुका उपाध्यक्ष दत्ताभाऊ दाभाडे, कांतासेठ नवपुते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एस.वाय.अन्सारी, माजी नगरसेवक सय्यद नजीबभाई, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, एजाज अत्तार, मुहम्मद आवेज शरीफ, सय्यद शफी अत्तार, ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, पत्रकार अयुब बागवान, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सरवरखान पठाण, तालुकाध्यक्ष अब्दुल खालेक कुरेशी, धोंडराई सर्कलचे युवानेते अजीम इनामदार, वसीम फारुकी, नवीद मशायक, शेख मोहसीन भाऊ, शेख मकसूद, बागवान समाजाचे अध्यक्ष माणिकसेठ बागवान, अब्दुल सत्तार कुरेशी, जानमोहम्मद बागवान, माजी नगरसेवक मंजूर बागवान, मोहसीन बागवान, शब्बू मशायक, काझी शौकत, गुफरान इनामदार, नईम बिल्डर, नईम बागवान, काझी शफिक काझी शकील यांच्यासह गेवराई शहर व तालुक्यातील रोजदार मुस्लिमबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**



दै. लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. दोन एप्रिलला दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. याच सोहळ्यात राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. त्याअनुषंगानेच शनिवारी दै. लोकाशाचे संपादक विजयराज बंब यांनी पत्रकार परिषद घेवून नऊ जणांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे. दरम्यान या कार्यक्रमाला राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार व सर्व लोकप्रतिनिधींची उपस्थिती राहणार आहे. दै. लोकाशाने आठरा वर्ष पुर्ण केले असून आता १९ व्या वर्षात लोकाशा पर्दापण करत आहे. याअनुषंगानेच यंदापासून लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव सलग तीन दिवस चालणार आहे. याच महोत्सवाची माहिती देण्यासाठी शनिवारी संपादक विजयराज बंब यांनी लोकाशा कार्यालयात पत्रकार परिषद घेवून संवाद साधला. लोकाशा महोत्सवाची सुरुवात २०१० साली करण्यात आली होती. यावर्षी लोकाशाच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान राज्यस्तरीय लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.३१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा क्रांतीनाना मळेगावकर यांचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये सहभागी होणार्या सर्व महिलांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत.

# अंशत: अनुदानित शाळांना टप्पा वाढ मागणीसाठी आझाद मैदानात

## महिला शिक्षकांचा आत्मदहनाचा प्रयत्न ; पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव अनुदानाच्या टप्प्यासाठी निधीची तरतूद करा या मागणीसाठी राज्यातील शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले. परंतु आपल्या हक्काच्या वेतनासाठी सातत्याने आंदोलन करून ही सरकारला कसलीच जाग येत नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या महिला शिक्षिकांनी अंगावर रॉकेल ओतून घेत स्वतःला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली.





राज्यातील अंशतः अनुदानित, विनाअनुदानित त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व मूल्यांकनास पात्र असलेल्या शाळांचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावर आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलन करीत आहेत. परंतु सातत्याने आंदोलन करून आपल्या हक्काच्या मागण्या शासनापुढे मांडून देखील शासन आपल्या मागण्या पूर्ण करत नाहीत. आम्ही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाही सरकार आमच्या मागण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करत नाही त्यामुळे आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या शिक्षकवृंदात संतापाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी तीव्र संतापलेल्या गावंडे मॅडम आणि साळवी मॅडम या दोन्ही मॅडम दोन महिला शिक्षिकांनी काल दिनांक २४ मार्च २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास आझाद मैदानात स्वतः च्या अंगावरती रॉकेल ओतून स्वतःला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान सदर घटनेची माहिती मिळताच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सर्व प्रकारची माहिती घेतली. यावेळी जीवाचं बरं वाईट करू नका किंवा आत्मदहना सारख्या मार्ग अवलंबून आपलं जीवन संपवू नका. शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या सरकारकडे मांडू. सरकार निश्चितच आपल्या मागण्या पूर्ण करेल असा विश्वास यावेळी शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी व्यक्त करत कोणत्याही शिक्षकांनी चुकीचं पाऊल उचलू नये असे आवाहन आंदोलनकर्त्यां शिक्षकांना केले.

# स्वामी विवेकानंद विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे स्वामी विवेकानंद विद्यालय बावी या शाळेत १९ रोजी सायंकाळी विद्यार्थांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले,यावेळी मराठी, हिंदी, देशभक्तीपर गीत,लावणी, भारतीय संस्कृती दर्शविणारे तसेच साऊथ इंडियन अशा विवीध गीतांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य सादर केले तसेच व्यसनमुक्ती, हुंडा बंदी आणि शिक्षणाचे महत्व असा संदेश देणारी नाटिका ही विद्यार्थ्यांनी सादर केली.

शालेय अभ्यासक्रम त्याचबरोबर,स्पर्धा परीक्षांचे आयोजन, शैक्षणिक सहल तसेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी तसेच वर्षभर विविध उपक्रम राबविणारी शाळा म्हणून स्वामी विवेकानंद विद्यालयाकडे पाहिले जाते.त्यातच दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन आणि नियोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या आजोबांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली,कार्यक्रमाच्या मध्यावधी एस.जे.लाईव्ह यांनी शाळेला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक उत्कृष्ट व्हिडिओ तयार केलेला दाखवताना त्या व्हिडीओने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

विद्यार्थ्यांची उत्तम तयारी, उत्कृष्ट पद्धतीचे भव्य नियोजन,तीन मोठ मोठया स्क्रीन, लाईव्ह संपुर्ण कार्यक्रम,अतिशय प्रभावी साऊंड सिस्टीम, समर्पक विद्युत रोषणाई,विद्यार्थ्यांची गीतांना शोभणारी ड्रेसिंग,वेशभूषा आणि हजारो मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थांनीच संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच चिमुकल्यांच्या नृत्य व अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली,कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

# सकल जैन समाजाच्या बीड अध्यक्षपदी प्रेमचंद लोढा

## भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सवाचे स्वागताध्यक्ष समाजभूषण नितीनचंद्र कोटेचा

**बीड । प्रतिनिधी**

भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असून त्या अनुषंगाने रविवार, २३ मार्च रोजी जैन धर्मातील सर्व संप्रदायातील प्रमुखांच्या उपस्थितीत जैन भवन येथे खेळीमेळीच्या वातावरणात बैठक संपन्न झाली. या बैठकीत सकल जैन समाजाच्या बीड अध्यक्षपदी प्रेमचंद लोढा यांची सर्वानुमते २०२५-२६ यावर्षाकरिता निवड करण्यात आली. तर भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी समाजभुषण नितीनचंद्र कोटेचा तर प्रोजेक्ट चेअरमनपदी पुनम नहार यांची निवड करण्यात आली.



**या महोत्सवामध्ये शहरात भव्य मिरवणूक काढली जाणार आहे. तसेच रक्तदान शिबीर, दंत शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, प्रबोधनपर व्याख्यान अशा विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे, असे प्रोजेक्ट चेअरमन पुनम नहार यांनी सांगितले आहे.**

या बैठकीमध्ये सकल जैन समाजाच्या अध्यक्षपदी सर्व संप्रदायातील प्रमुख व्यक्तींना एक वर्षासाठी पदभार देण्याचे सर्व संमतीने ठराव पास करण्यात आला.

# बीड शहरातील व्यापरांकडून सक्तीने वसुली करु नये : भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे

**बीड । प्रतिनिधी**



दीड शहरातील सर्व व्यापाऱ्यांकडून सक्तीने वसुली कुणीही करू नये असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की बीड नगरपालिके मार्फत बीड शहरातील व ग्रामीण भागातील फळविक्रेते भाजीपाला विक्रेते शेळी मेंढी कोंबड्या इत्यादी विकणाऱ्या व्यापाऱ्यांकडून वसुली करत दरवर्षी बीड नगरपालिके मार्फत टेंडर काढले जातात यावर्षी १५ मार्च रोजी टेंडरची मुदत संपलेली आहे याबाबत संबंधित गुत्तेदार व्यापाऱ्याकडून व शेतकरी बांधवांकडून सक्तीने वसुली करत आहे मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी स्वतः या विषयाचा फॉलोअप घेऊन जातीने लक्ष घालून ही केली जाणारी वसुलीवर तात्काळ प्रतिबंधक उपाय म्हणून शोधावेत आणि वसुली करण्यास निर्बंध लावावेत अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगरपालिकेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकामध्ये म्हटले आहे गोरगरीब व्यापाऱ्यांना जर कोणी त्रास देत असेल तर आपण स्वतः नगर परिषदेचा चाललेला हा सावळा गोंधळ वसुली करणारा हा आपण बंद केल्याशिवाय आणि व्यापाऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही असे देखील प्रसिद्धी पत्रकात नवनाथ अण्णा यांनी म्हटले आहे आता या वरील महत्वाच्या विषयावर नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निता अंधारे मॅडम यांनी तात्काळ लक्ष देऊन नेमके काय चालले आहे हे स्वतः पाहावे आणि या व्यापाऱ्यांवर होणार अन्य थांबवावा आणि आणि गोरगरीब व्यापाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा असे सर्व बीड शहरातील नागरिकांमधून बोलले जात आहे .

नमुना - इ 4

(नियम - 19 पहा)

निवडणूक निर्णय अधिकारी :- आर. बी. कातळे | मोबाईल नंबर - 8108597989 | पदनाम :- **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. धारुर, जि. बीड.**

सहकारी संस्थेचे नांव :- लक्ष्मी महिला नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, धारुर, ता. धारुर, जि. बीड.

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम 2014 च्या नियम 19 प्रमाणे अधिकारांचा वापर करुन आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, बीड यांचे आदेशास अनुसरुन व मान्यतेने मी, आर. बी. कातळे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. धारुर, जि. बीड. याव्दारे लक्ष्मी महिला नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, धारुर, ता. धारुर, जि. बीड. या संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्यासाठी निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन जाहिर करीत आहे. आणि या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ 2 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या संबंधातील निवडणूका नियत करीत आहोत.

**अनुसूची**

| अ.क्र. | मतदार संघाचे नांव | | अंतीम मतदार यादी प्रसिध्द केलेचा दिनांक | नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठीचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशन पत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्राची सुची प्रसिध्द करणे | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | वैदय नामनिर्देशन पत्राची सुचि प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | निवडणूक लढविणा-या उमेदवारांना निशीणीचे वाटप व अंतीम यादीचे प्रकाशन करण्याचा दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | संस्थेच्या सभासदातून निवडलेले (सर्वसाधारण गटातून) | 6 | | 26.03.2025 ते 01.04.2025 सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यत (निवडणूक कार्यालयात) | दि. 01.04.2025 नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिवशी वेळ समाप्त झालेनंतर दुपारी 4.00 वाजता (निवडणूक कार्यालयात) | दि. 02.04.2025 सकाळी 11.00 वाजेपासून छाननी संपेपर्यत (निवडणूक कार्यालयात) | दि. 03.04.2025 सकाळी 11.00 वाजता (निवडणूक कार्यालय व संस्था नोटीस बोर्ड) | 03.04.2025 ते 17.04.2025 सकाळी 11.00 ते 3.00 वाजेपर्यत (निवडणूक कार्यालयात) | दि. 21.04.2025 सकाळी 11.00 वाजता (निवडणूक कार्यालय व संस्था नोटीस बोर्ड) | दि.01.05.2025 वेळ सकाळी 8.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यत स्थळ-नंतर जाहिर करण्यात येईल | दि. 01.05.2025 मतदान संपल्यानंतर लगेच स्थळ-नंतर जाहिर करण्यात येईल | दि. 01.05.2025 मतमोजणी संपल्यानंतर लगेच |
| 2 | अनुसूचित जाती/जमाती सभसदांसाठी (राखीव) | 1 | | | | | | | | | | |
| 3 | महिलांसाठी (राखीव) | 2 | | | | | | | | | | |
| 4 | इतर मागास प्रवर्ग (राखीव) | 1 | | | | | | | | | | |
| 5 | भटक्या विमुक्त जाती/जमाती व वि.मा.प्र. (राखीव) | 1 | | | | | | | | | | |
| | एकुण | 11 | | | | | | | | | | |

टिप :- 1) स्तंभ क्रमांक 6 व 8 मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी संबंधीत संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल 2) मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळू शकेल. 3) राज्य सह.निवडणूक प्राधिकरण यांनी प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाची आहेत. (4) निवडणूक चिन्हाचे वाटप स्तंभ 8 मधील तारखेस व ठिकाणी सकाळी 11-00 वा.करण्यात येईल. (5) मतदान व मतमोजणी वगळून निवडणूक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक सुटटयाखेरीज सुरु राहील.

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचा पत्ता :- सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. धारुर, जि. बीड.

**दिनांक :** 25.03.2025

(आर. बी. कातळे)
निवडणूक निर्णय अधिकारी

(आर. बी. कातळे)
तालूका सहकारी निवडणूक अधिकारी
ता. धारुर.

प्रत,

1 सचिव, लक्ष्मी महिला नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, धारुर, ता. धारुर, जि. बीड. यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
2 निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
3 मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. बीड यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.२५ मार्च २०२५ पान ४

**श्री क्षेत्र दत्त संस्थानचे मठाधिपती श्रीहरी महाराज पवार यांना पितृ शोक**

## दत्तोबा पवार आप्पा अनंतात विलीन



**बीड :** कोल्हारवाडी फाटा, बार्शी रोड, बीड येथील श्री क्षेत्र दत्त संस्थानचे सर्वे सर्वा श्रीहरी महाराज पवार यांचे वडिल दत्तुबा पवार (आप्पा) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले मृत्युसमयी त्यांचे वय १०८ वर्ष होते दत्तोबा पवार यांनी दत्तभक्तांनच्या सुख:दुखासाठी आपली अवघी हयात खर्ची घातली.रविवारी सकाळी दत्त संस्थानच्या पाडुरंगाने अनंतात विलीन होणे पसंत केले आणि त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारे दत्तभक्त व परिवार शोकसागरात बुडून गेला.त्यांचे निधन परिवारासाठीच नव्हे,तर दत्तभक्तांनसाठीही कधीही भरून न येणारी हानी आहे. अंत्यसंस्कारासाठी जमलेला समुदाय आप्पांच्या मनाची श्रीमंती सिध्द करत होता; राजकीय, सामाजिक,वारकरी व सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यसंस्कारासाठी उपस्थित लावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले,दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे .

**बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था....**

# 'चाळणी झालेल्या रस्त्यांवर अजितदादा अवतरले' मुखवटे घालून लक्ष्यवेधी आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे,वाळुमिश्रित खडीचा धुराळा उडत असुन अपघातांची संख्या वाढली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्याच्या





नगरविकास विभागाकडे वर्षभरापूर्वी पाठविण्यात आलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यास तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसह धुळे



ते सोलापूर रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजवुन रखडलेले दुभाजकांचे काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत. बीड ते अहिल्यानगर मार्गाचे काम संथगतीने होत असुन प्रमुख शासकीय कार्यालये असणाऱ्या रस्त्यांवर गर्दी होत असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे या मागण्यांसाठी सामाजिक

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ वार सोमवार रोजी वाजता कारंजा टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपरिषद बीड कार्यालय अजितदादा पवार यांचे मुखवटे घालून चाळण झालेल्या रस्त्याची पाहणी करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, मुबीन शेख,, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते. मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

बीडमधील १७ मुख्य रस्ते मंजुरीचा प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यांना मंजुरी देऊन निधी देण्यात यावा. बीड नगर पालिकेने एक वर्षापूर्वी बीड शहरातील ११० कोटी रूपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राज्याच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# लोकाशा महोत्सवासाठी अजित पवार, पंकजाताईचीं प्रमुख उपस्थिती

### २ एप्रिलला दिमाखदार सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

दैनिक लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पकंजाताई मुंडे यांच्यासह राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार, सर्व लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती राहणार आहे. लोकाशा महोत्सवात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना लोकाशा भूषण पुरस्कार देऊन,





गौरविण्यात येणार आहे. एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे . सामजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शांतीलालजी मुथा, कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रसिध्द अभिनेते सयाजी शिंदे, सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बुलढाणा अर्बनचे संस्थापक राधेशाम जी चांडक, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रसिद्ध कुस्तीपटू राहूल आवारे, पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल टी.व्ही.-९ च्या अँकर निखीला म्हात्रे आरोग्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल ओमप्रकाश शेटे, व मंगेश चिवटे पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विलास बडे यांना यावर्षीचा लोकाशा भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, दि.२ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता दैनिक लोकाशाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# मालकाचे पैसे लुटण्याचा केला प्लॅन आणि स्थानिक गुन्हे शाखेने केला गजाआड!

**बीड । प्रतिनिधी**

सैहीमुद्दीने फैमुद्दीन शेख वय २४ व्यवसाय ड्रायव्हर रा. माजलगाव हा दि.१० मार्च रोजी सायंकाळी ६. सुमारास तेलगांव रोडवर कारी फाटयाजवळ त्याचे ताब्यातील अशोक लेलँड दोस्त वाहन कळंब येथुन केज,धारुर, तेलगाव मार्गे माजलगावकडे येत असतांना कारी फाटयाजवळ आल्यावर यातील अनोळखी तिघेजन स्पेंडर गाडीवर मागुन येवुन फिर्यादीस शिवीगाळ करु लागले फिर्यादीस काहीतरी झाले असेल असे वाटल्याने गाडी रस्त्याचे बाजुला घेवुन थांबवली असता तिन इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन डोळयात चटणी टाकुन मारहाण करुन गाडीमधील १,३५,८००/- रु रोख रक्कम जबरीने चोरुन नेले असल्याची तक्रार पोलीस स्टेशन ला फिर्यादीने दिली. वरील नमुद गंभीर गुन्हयाचे अनुषंगाने पो.नि. स्था.गु.शा. श्री. उस्मान शेख यांनी त्यांचे पथकास गुन्हा उकल करण्यासाठी सपोनि विजयसिंग जोनवाल व पोउपनि महेश विग्ने यांना आदेश दिले. पोउपनि महेश विग्ने यांनी आपल्या पथकासह दि.२२/०३/२०२५ रोजी गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली असता



गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, सदरचा प्रकार हा इसम नामे रहिम चाँद शेख रा.

▶▶ उर्वरित पान २ वर



*रयत शिक्षण संस्थेचे कंकालेश्वर विद्यालय बीड येथे आज १९९९-2000च्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा (गेट-टुगेदर )चे कार्यक्रम पंचवीस वर्षानंतर आयोजित करण्यात आला. गुरुजनवर्ग शिंदे सर , वाकचौरे सर गोलेकर सर शिंदे मॅडम काजी सर बांगर सर शेकडे सर तसेच बॅच सर्व विद्यार्थी विद्यार्थी आणि विद्यार्थींनी उपस्थित होते.*



## प्रभु कुंडलिक विधाते यांचे वृद्धापकाळाने निधन,वृक्षारोपण करून केले अस्ती विसर्जन

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील मुकादम सोमीनाथ ( आण्णा ) विधाते यांचे वडील प्रभू कुंडलिक विधाते यांची वृद्धापकाळाने दि.२१ मार्च रोजी सकाळी ७ वाच्या सुमारास राहत्या घरी प्राणज्योत मालवली मृत्यू समयी त्यांचे वय ९५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली सूना,नातवंडे, परतोंडे असा मोठा परिवार आहे.

## चिंतेश्वराच्या कृपेने सिद्धेश्वराच्या दरबारात शिवपुराण

**मठाधिपती दिलीप बाबा यांच्या शुभहस्ते प्रारंभ!**



**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील सावता नगर भागात श्री. भगवान चिंतेश्वराच्या कृपाशीर्वादाने व मठाधिपती दिलीप बाबा घोगे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार दि (२४) मार्च रोजी सकाळी सिद्धेश्वर मंदिरात महापूजा करून प्रारंभ करण्यात आला.

समस्त सावता नगर मंडळीच्या सहकार्याने शिव मंदिर सिद्धेश्वर येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व शिवपुराण कथा सप्ताहाला पहील्यांदाच सुरुवात केली आहे. इथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सातत्य ठेवल्याने अखंडपणे सुरू असलेल्या राम कथा, अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा, सिद्धेश्वर कीर्तन महोत्सव, महाशिवपुराण असा प्रवास करत १२ वर्षाचा तप पूर्ण झाला असून महाशिवरात्री निमित्त भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते दरवर्षी

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड अमृतास स्कूल ऑफ ब्युटी ऑन मेकअप आर्ट प्रा. लि. लोकशाही पत्रकार संघांचे सं. अ. भागवत वैद्य, महिला उद्योग विकास समितीचे प्रदेश कार्याध्यक्ष सौ. संध्या सरोदे यांनी भेट देऊन पाहणी केली. बीड जिल्ह्यात प्रथम महिला व मुलींना मेकअप आर्टिस्ट, ब्युटी पार्लर मालक, नौकर होण्याची संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट कु. अमृता अविनाश नाईकवाडे व प्रशिक्षक राहुल यांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी पण आमचा शिल्ड देऊन सन्मान केला. बीड जिल्ह्यातील महिलांनी ब्युटी पार्लर, मेकअप आर्टिट्स होऊन आपला व्यवसाय निर्माण करावा. मी पण इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट आणि डाईट वेलनेस कोच आहे. लवकरच आपली एक शाखा परळी मध्ये चालू करण्याचा प्रयत्न करू. अशा भावना सौ. सरोदे यांनी व्यक्त केल्या.*

## खांडे पारगाव हायस्कुल मध्ये नवभारत साक्षरता कार्यक्रमा अंतर्गत नवसाक्षरांची परिक्षा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित खांडे पारगाव हायस्कुल खांडे पारगाव विद्यालयात दि.२३ मार्च २०२५ रोजी उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत नवसाक्षर व्यक्तींची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मुल्यमापन चाचणी (एफएलएनझटी) शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार संपन्न झाली.

परिक्षेस ३ परिक्षार्थ उपस्थित होत्या ज्यामध्ये राऊत शांताबाई, राऊत कालिंदा, राऊत जयश्री यांनी परिक्षा देवून साक्षर झाल्या. सदरील परिक्षेसाठी शाळेच्या संपूर्ण स्टाफचे सहकार्य लाभले. परिक्षा होत असतांना परिक्षा केंद्रास जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी माटे एस.बी. आणि खांडे पारगाव केंद्र प्रमुख शेख जे.आर. आणि क्षीरसागर सर यांनी भेट देवून परिक्षे संदर्भात समाधान व्यक्त करुन सर्वांचे अभिनंदन केले.

# पीएम घरकुल योजनेचा इंजिनिअर यांनी लुटीचे घातले थैमान यांना कोण आवर घालणार ?

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात गंगामसला सर्कलमध्ये प्रायोगिक तत्त्वावर नियुक्त असलेले इंजिनीयर यांनी आपला मनमानी कारभार चालू ठेवला असून पंतप्रधान आवास योजनेतील घरकुल लाभार्थ्यांची मोठ्या प्रमाणात लूट चालू केले आहे याला कोणी आवर घालणारे आहे की नाही असा प्रश्न सर्वसामान्य जनतेत व्यक्त केला जात आहे

माजलगाव तालुक्यात पंतप्रधान आवास योजनेचे घरकुल मंजूर झाले आहेत लाभार्थी कागदपत्राची पूर्तता करत आहेत तरीही घरकुलाचा पहिला हप्ता काढण्यासाठी तीन ते चार हजार रुपये द्यावे लागतात प्रत्येक हप्त्याला ही रक्कम ठरलेली आहेच यामुळे सर्वसामान्य नागरिक वैतागले आहेत पंतप्रधान आवास योजनेचे घरकुल गोरगरीब जनतेसाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी एक नवीन स्वप्न आहे आपल्याला पंतप्रधानाच्या माध्यमातून घर मिळणार आहे त्यात आपला सुखी संसार होणार आहे अशी आज पुराशी बाळगून असणाऱ्या गोरगरीब जनतेच्या स्वप्नावर पाणी टाकण्याचे काम गंगामसला सर्कल मधील प्रायोगिक तत्त्वावर (कॉन्ट्रॅक्ट बेस) वर नियुक्त असलेले इंजिनियर पाणी टाकण्याचा प्रयत्न करत आहे माजलगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना वेळोवेळी सूचना देऊनही अशा भ्रष्ट लोकांवर कार्यवाही करण्याऐवजी त्यांना सूट दिली जाते आणि हेच कर्मचारी जनतेचे लोट करीत आहेत यामुळे तालुक्यातील भ्रष्ट कर्मचाऱ्यावर कोणी आवर घालणार आहे का? असा प्रश्न लाभार्थी जनतेतून व्यक्त करण्यात येत आहे अशा गोष्टी बंद होणार नसतील तर न्याय तरी कोणाकडे मागावा असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे जिल्ह्यातील कोणीतरी गोरगरिबाचा वाली होवा आणि गोरगरीब जनतेच्या होणारी लूट थांबवा अशी प्रतिक्रिया सर्वसामान्य लाभार्थी जनतेतून व्यक्त केले जात आहे.



*जुनेरा फातेमा मोमीन जावेद, या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील केला पहिला रोजा पूर्ण.*





CMYK